दिव्य मराठी

जळगाव सिटी 12-10-2023

# वैजनाथला सायबर क्राइमच्या प्रोसेसची जनजागृती

प्रतिनिधी | पाळधी

महाराष्ट्र सायबर सेल, क्विक हिल फाउंडेशन व कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातर्फे वैजनाथ येथे सायबर सुरक्षाबाबत जनजागृती करण्यात आली.

विद्यापीठाच्या संगणक शास्त्र प्रशाळेत एमएससी आयटीचे विद्यार्थी राजश्री कापुरे व आशिष पाटील यांनी गावातील तरुण मंडळी, शेतकऱ्यांना सायबर सुरक्षेवर मार्गदर्शन करून ऑनलाइन होणाऱ्या विविध प्रकारच्या सायबर क्राईम बद्दल माहिती दिली. तसेच या प्रकारापासून सावध कसे राहावे, सायबर क्राईम झाला तर काय प्रोसेस फॉलो करावी याबद्दल माहिती दिली.



सायबर क्राइम तसेच सुरक्षाबाबत जनजागृती करताना राजश्री कापुरे व आशिष पाटील.